झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्रं. SRA/CO/OW/२०२४/२६४८८
दिनांक : १७/०५/२०२४.

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
प्रिन्स पार्क एसआरए सह.गृह.संस्था मर्या.,
प्लॉट क्र. ४६१ (पा.) ५०१ (पा.) ५०५ (पा.) ६६७ (पा.)
१/६६७ (पा.), क्रांती नगर, काळा किल्ला,
धारावी, मुंबई ४०००१७.

**विषय : संस्थेतील सभासदांच्या सदनिका/गाळा हस्तांतरणाबाबत.**

संदर्भ : आपलेकडील अर्ज प्राधिकरणास प्राप्त दि. १६/०५/२०२४ रोजीचे पत्र.

आपले लक्ष वरील संदर्भिय विषयाकडे वेधण्यात येत आहे.

२/- वरील संदर्भिय पत्रान्वये आपण खालील खरेदीदार यांचे नावे निवासी सदनिका हस्तांतरणासाठी या कार्यालयाकडे विनंती अर्ज केलेला आहे.

| अ.क्र. | मुळ झोपडीधारकाचे नाव | मंजुर परि-२ मधील अनु क्रं. | सदनिका/ गाळा क्रमांक | खरेदीधारकाचे नाव | विक्री करारनामा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. आडसुळ पोपट एम्. | ३३ | सदनिका क्र. ८११ | श्री. सुभाष जगन्नाथम दासरी | २४/११/१९९४ |

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावासोबत संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतीवरुन असे दिसून येते की, मुळ झोपडीधारकांनी त्यांची सदनिका खरेदीदारास विक्री करारनाम्यानुसार सन १९९५ पुर्वी विक्री केलेले दिसून येते. अशा प्रकरणात मृदुंगाचार्य नारायणराव कोळी एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., माहिम, मुंबई-१६ या संस्थेतील सभासदांच्या हस्तांतरणाबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांनी दि. १६/०९/२०१५ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन सदरील हस्तांतरणास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

१) उपरोक्त तक्त्यामधील नमूद खरेदीधारकांनी आपल्या संस्थेचे मूळझोपडीधारकाकडून सन १९९५ पूर्वी झोपडे विकत घेतलेले असल्याने त्यांना संस्थेचे सभासदत्व देऊन भागदाखला त्यांचे नावाने निर्गमित करावा व ते करताना दिनांक ०१/०१/१९९५ पूर्वी संबंधितांनी झोपडी खरेदी केल्याबाबतची आवश्यक त्या कागदपत्रांच्या आधारे संस्थेने खात्री करावी.

२) सदरचे हस्तांतरण दिनांक ०१/०१/१९९५ पूर्वी झोपडे खरेदी केलेल्या व्यक्तींचे असल्याने सदर प्रकरणात हस्तांतरणासाठी हस्तांतरण प्रिमियम लागू होणार नाही याची नोंद घ्यावी.

३) उपरोक्त तक्त्यामधील नमूद खरेदीधारकांच्या कागदपत्रांची खात्री झाल्यावर आवश्यक ते भागभांडवल व प्रवेश शुल्क जमा करुन मूळ सभासदांच्या जागेवर संस्था स्थरावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नियम १९६१ व संस्थेचे मंजूर उपविधीस अधिन राहून सदर व्यक्तींना रितसर संस्थेचे सभासदत्व देऊन भागदाखला निर्गमित करावा व त्यांची नावे संस्थेच्या सभासद नोंदवहीत व यादीवर नोंद करावी व यापूर्वी जर मूळ सभासदांच्या नावे भागदाखला निर्गमित केला असल्यास त्यात सदर बदलाची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणी संस्थेने सादर केलेल्या कागदपत्रावरुन उक्त निर्णय घेण्यात आला असून इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे अर्जदाराविरुध्द कारवाई सुरु असल्याचे निर्दर्शनास आल्यास सदर मान्यता रद्द करण्यांत येईल.

**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था, मुंबई शहर ,**
**झो.पु.प्रा., मुंबई.**

**प्रत माहितीसाठी :**

**१) श्री. आडसुळ पोपट एम्.**

**२) श्री. सुभाष जगन्नाथम दासरी ,**

**पत्ता : सदनिका क्र.८११, प्रिन्स पार्क एसआरए सह.गृह.संस्था मर्या.,**
**प्लॉट क्र. ४६१ (पा.) ५०१ (पा. ५०५ (पा.) ६६७ (पा.)१/६६७ (पा.),**
**क्रांती नगर, काळा किल्ला, धारावी, मुंबई ४०००१७.**

# प्रिन्स पार्क एस.आर.ए. सहकारी गृह निर्माण संस्था (मर्या.)

प्लॉट क्र. ४६१(पा.) ५०१(पा.)५०५(पा.)६६७(पा.)१/६६७(पा.) क्रांती नगर, काळा किल्ला, धारावी, मुंबई - ४०० ०१७.

नोंदणी क्र. : एम्.यु.एम्./एस.आर.ए./एच्.एस्.जी./टी.सी.१३१५८/२०१८

जावक क्र. : दिनांक : २९.०४.२०२४

आज प्राप्त झाले
16 MAY 2024
झोपडट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

प्रति,
**मा.सहाय्यक निबंधक,**
सहकारी संस्था (मुंबई शहर),
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**विषय :- संस्थेतील सभासदांच्या हस्तांतरणाबाबत विनंती.**

**संदर्भ :-** दिनांक १०.०४.२०२४ रोजी सभासदाचा आलेला सदनिका नाव करण्यासाठीचा अर्ज.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कि, संस्थेच्या सभासदाचा आलेला खालील अर्ज हस्तांरणा बाबत आहे त्याची तपशिल माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | विकणा-याचे नाव | इमारत निवासी / अनिवासी सदनिका / गाळा क्रमांक | विकत घेगा-याचे नाव |
|---|---|---|---|
| ०१. | श्री. आडसुळ पोपट एम्. | ८११, ८ वा मजला परिशिष्ट अनु.क्र. ३३ | श्री. सुभाष जगन्नाथम दासरी |

वरील नमूद केलेल्या सभासदानी निवासी / अनिवासी, सदनिका / गाळा सन १९९५ पूर्वी विकत घेतला आहे. सोबत खरेदी करारनामा / शपथपत्र प्रत जोडत आहे. तरी कृपया वरील अर्जासोबत जे काही निर्णय घ्यायचे आहेत. त्याचे आपण संस्थेला आदेश देण्याची कृपा करावी, हि विनंती.

आपला विश्वासु,

**अध्यक्ष / सचिव**

प्रिन्स पार्क एस.आर.ए. सह. गृह निर्माण संस्था (मर्या.)
धारावी मुंबई
नों क्र.
१३१५८/२०१८